**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास विधिज्ञ श्री. सी.एम.माने यांचेमार्फत शपथेवर सुरु**

**माझे पुराव्याचे शपथपत्रातील सर्व मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.**

**११.** मी प्रकरणामध्ये फिर्यादी शिवम डेव्हलपर्स तर्फे मी स्वत: व आरोपी भारत नखाते व सिसोदिया यांच्यामध्ये झालेल्या समजुती करारनामा स्टॅम्प पेपरवर असलेला दाखल केलेला आहे. या करारनाम्यावर माझी, भारत नखाते व सिसोदिया यांच्या सहया आहेत. त्यांतील मजकुर बरोबर आहे. त्याच करारनाम्याच्या पाठीमागील बाजुस आरोपीस वेळोवेळी पैसे मिळाले बाबत त्यांनी स्वीकारलेबाबत मजकुर पावत्या आहे. त्या पावत्यावर केवळ आरोपीच्या सहया आहेत. त्या करारनाम्याचा भाग आहेत. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते.

**१२.** आरोपीने मला दिनांक ०५/१०/२००० रोजी रक्कम रुपये चार लाख प्रत्येकीचे दोन धनादेश सेवा विकास बॅक मधील धनादेश दिला होता. मला आता ते धनादेश क्र.१८४७५६ व १८७७५७ दाखविण्यात आले. त्यावर आरोपी भरत नखाते यांची सही आहे. दोन्ही धनादेशास अनुक्रमे **निशाणी क्र.३५, ३६** देण्यात येते. दोन्ही धनादेश मी वटणेकामी लावला असता तो दिनांक ०९/०३/२०११ रोजी अनादरीत झाले बद्दल मेमो देण्यात आले. दोन्ही मेमोवरती बॅकचे सही शिक्के आहेत. त्या दोन्ही मेमोस **निशाणी क्र. ३५—१ व ३६—१** असे देण्यात येते. मला पिंपरी चिंचवड मध्यवर्ती सहकारी बॅक यांनी दोन्ही धनादेश का वटले नाहीत कारण नमुद करुन मला पत्र दिले होते. दिनांक २६/०३/२०११ रोजीचे बॅकेचे मुळ पत्र मी प्रकरणात दाखल केले आहे. त्यावर शाखाधिकारी यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ३७** देण्यात येते.

माझे विधिज्ञांनी आरोपीला दिनांक ०१/०४/२०११ रोजी नोटीस पाठवली होती. त्याची ऑफीस कॉपी मी प्रकरणात दाखल केली आहे. मला आता ती दाखविण्यता आली. त्यावर माझे विधिज्ञांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३८** देण्यात येते. ती नोटीस आरोपीला दिनांक ०१/०४/२०११ रोजी पोस्टाने पाठवली त्याबाबतीच पावती प्रकरणात दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येते. त्यानंतर आरोपीस पाठवलेली नोटीस नॉट क्लेमड् परत आलेली मी बंद लिफाफा प्रकरणात दाखल केला आहे. मला आता तो बंद लिफाफा दाखविण्यात आला. फिर्यादीच्या विधिज्ञांनी बंद लिफाफा उघडण्याची न्यायालयासमक्ष उघडण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. न्याायालयासमक्ष तो लिफाफा उघडण्यात आला. त्यामध्ये आरोपीला दिनांक ०१/०४/२०११ पाठविलेली नोटीस व त्यावरती विधिज्ञांची सही आहे. त्या नोटीस व बंद लिफाफास एकत्रीतपणे **निशाणी ४०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीच्या विाधिज्ञांनी उलटतपासकामी तोंडी विनंती केली असता मंजुर.**
**प्रकरण उलटतपासकामी तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2026.03.25 14:55:58 +0530

(एस.एस. चव्हाण )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपरी, पुणे

दिनांक : १२.०३.२०२६